ऑगस्ट – २००७

# मा. महाराष्ट्र राज्य सरकार महोदय ह्यांस

**२५ जून २००७** रोजी माजी सैनिक व थोर समाज सेवक सन्माननीय **श्री अण्णासाहेब हजारे** यांनी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री **मा. ना. श्री. पतंगरावजी कदम** यांना राज्यातील पतसंस्था व नागरी सहकारी बँका यांच्याबद्दल सरकारच्या उदासीनतेबाबत एक पत्र लिहले. त्या पत्रामध्ये पतसंस्था व बँकामध्ये संकटात सापडलेल्या ठेवीदारांच्या रकमा त्वरीत परत मिळणेसाठी आग्रही सुचीत केले. परिणामी महाराष्ट्र राज्याचे सरकार व सहकार खाते त्याचक्षणी खडबडून जागे झाले. आणि राज्यभर पतसंस्था व बँकांचे सर्वेक्षण अहवाल जमा करण्यास मा. सहकार आयुक्तांनी त्यांच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले. शिवाय **१ ऑगस्ट २००७** रोजी पुन्हा मा. अण्णासाहेब हजारे यांनी ह्याच विषयासंदर्भात मा. मंत्री महोदयांना दुसरे पत्र दिले.आणि सर्वसाधारणपणे ७ ऑगस्ट २००७ पासून राज्यभर पतसंस्था व बॅकांचे सर्वेक्षण करण्यासाठी विहित नमुन्यातील माहिती जमा करण्याचे प्रत्यक्ष कामकाज सुरू करून मा. अण्णासाहेबांच्या आवाहनाला त्वरीत प्रतिसाद दिला.

या पूर्वीच्या कालावधीत मा. सहकार आयुक्त कार्यालयाने पतसंस्थांसाठी M. I. S. प्रणाली विकसीत करुन त्यामध्ये **सीडी रेशो**, **तरलता**, **थकबाकी** आणि **नफा – तोटा** यावर आधारीत गुण निश्चित करून संस्थांचे वर्गीकरण करण्यास सुरवात केली. राज्यात अनेक पतसंस्था व बँकावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ, ७८, ८३, ८८ अन्वये कारवाई चालू केली. काही संस्थांविरूध्द भारतीय दंडविधानानुसार फौजदारी कारवाई सुध्दा सुरु केली. व नुकतेच म्हणजे ७ ऑगस्ट २००७ रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार आयुक्त व प्रधान सचिव (सहकार) व विद्यमान महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण चे आयुक्त मा. श्री रत्नाकर गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली एक राज्यस्तरीय कृती समिती स्थापन केली. या समितीच्या कामकाजामध्ये **कामकाज बंद** असलेल्या बँका व पतसंस्थांच्या याद्या तयार करणे त्या संस्था **अवसयानात घेणेबाबत** मार्गदर्शन करणे, **ठेवी न मिळालेल्या** ठेवीदारांची यादी तयार करणे, ठेवीदारांचे ठेवीनुसार वर्गीकरण करणे, ठेवी परत करण्यासाठी मार्गदर्शन करणे, **कर्जदारांची यादी** तयार करणे व थकीत कर्जदारांसाठी **प्रभावी कर्ज वसुली** प्रकिया सुचवणे,प्रत्येक वॉर्डात / तालुक्यात ५ ते १० सहकारी संस्थांवर **सरकारी अधिकारी व लेखा परिक्षकांची नियंत्रण अधिकारी** म्हणून नेमणुक करणे, **क व ड वर्गातील संस्थांवर ८३, ८८, १०२ ई अन्वये** कार्यवाही सुचविणे, आवश्यकता असल्यास **फौजदारी गुन्हा नोदविण्यासाठी** मार्गदर्शन करणे, अशक्त संस्थांचे सशक्त संस्थांमध्ये **विलिनीकरण करणेसाठी** मार्गदर्शन करणे, प्रशासक व अवसायकांना मार्गदर्शन करणे, प्राप्त तक्रारींचा **दर सोमवारी** आढावा घेणे व सदरचा अहवाल शासनास वेळो – वेळी सादर करणे या **राज्यस्तरीय कृती समितीचा कार्यकाल ६ महिन्यांचा ठेवला** असुन आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्याचे शासनाने निश्चित केले आहे. व या कृती समितीच्या **महिन्यातून किमान २ सभा** घेण्याचे आदेश निर्गमित केले आहे.

एकंदरीत नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांचे संपूर्ण ध्रुव्वीकरण या माध्यमातून करण्यासाठी सरकार व सहकार खाते सज्ज झाल्याचे तूर्त या क्षणाला तरी दिसते. **परंतु हे प्रयत्न व कृती अत्यंत अपूरी व दिशाभुल**

**करणारी ठरण्याचीच दाट शक्यता आहे.** पतसंस्थांच्या समस्या यापेक्षा खुप वेगळ्या आहेत. आणि त्याकडे संबंधितांनी जाणिवपूर्वक दूर्लक्ष केल्याचे सर्वांच्या लक्षात आलेले आहे. कारण सभासदांकडून भाग भांडवल व विविध प्रकारच्या ठेवी जमा करून त्याचा विनियोग कायद्याप्रमाणे करण्याची जबाबदारी या पतसंस्थांवरच आहे. आणि हा मुलभुत विषय या ध्रुव्वीकरणात मुळ विषयाला बगल देवून वेगळ्या दिशेने जाण्याची शक्यता आहे.पतसंस्था व नागरी सहकारी बँका यामध्ये प्रामुख्याने वर्गीकरण करीत असताना बँकाना रिझर्व्ह बँकेने बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत लायसन्स देवून '' **डिपॉझिट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन**'' (D I C G C) द्वारे ठेवीदारांच्या १ लाख रूपये रक्कमांपर्यंत १०० टक्के संरक्षण दिलेले आहे. परंतु देशातील महाराष्ट्र / मुंबईसह पतसंस्थांना मात्र यामधून वगळलेले आहे. आणि म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार आयुक्त **श्री. रत्नाकर गायकवाड यांच्या पुढाकाराने २००३ साली '' महाराष्ट्र स्टेट को - ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीज् डिपॉझिट गॅरंटी कार्पोरेशन लि.,''( D. G. C )** नावाची सहकारी तत्वावरील संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे कार्यक्षेत्र असलेली एक राज्यस्तरीय पतसंस्थाच D. G. C. नावाने नोंदणी करण्यात आली. हेतू अत्यंत चांगला असताना देखील **पतसंस्थांमधील** ठेवींना विम्याचे संरक्षण देण्याच्या संकल्पनेच्या पूर्तीसाठी संबंधितांनी **D. G. C. नावाची सहकारी संस्था बेकायदेशीरपणे नोंदणी केली.** राज्य सरकार व सहकारातील अनेकांनी या D. G. C.च्या नोंदणीबद्दल व पुढील संभाव्य धोंक्यांबद्दल सरकार व सहकार खात्याला लेखी स्वरूपात अवगत केले होते. परंतु संबंधितांनी हा विचार धुडकावून लावला. राज्याचे **सहकार आयुक्त मा. रत्नाकर गायकवाड** यांनी स्वत:, ज्या पतसंस्थांचे **खेळते भांडवल रूपये १ कोटीहून अधिक आहे,** अशाच ७ टक्के संस्थांसाठी ही D. G. C. ची निमिर्ती आहे. आणि अशा पतसंस्थांनी **किमान १ टक्के इतकी रक्कम D.G. C.ला भागापोटी व ठेवींच्या २० टक्के रक्कम तरलतेपोटी ठेव** म्हणून ठेवावी **असे परिपत्रक दिनांक १२/०३/२००६ रोजी** काढून राज्यातील शेकडो पतसंस्थांना **D. G. C.**मध्ये करोडो रूपये गुंतविण्यास भाग पाडले. आणि सरते शेवटी जे व्हायला नको होते, परंतु ते होणारच होते, ते ३ वर्ष संपण्याच्या आतच दुर्दैवाने झाले. आणि महाराष्ट्र राज्याच्या सहकार चळवळीत अत्यंत धोकादायक असा संदेश पोहचला. व त्यामध्ये ज्या पतसंस्थांनी D. G. C. मध्ये भागाची रक्कम, ठेवीची रक्कम व प्रिमियमद्वारे करोडो रूपये दिले. त्या सर्व पतसंस्थांना आर्थिक नुकसान पोहचले आहे. त्या पतसंस्था लाखो रूपयांच्या नफ्यास मुकल्या आहेत. **D. G. C. ची '' आर्थिक स्थिती चांगली नाही ''** या नावाखाली राज्य सरकारने ही D. G. C संस्था बंद करण्याचा निर्णय घेतल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. परंतु **ज्या पतसंस्थांनी भाग, ठेवी व प्रिमियम पोटी करोडो रूपये D. G. C. ला दिले, त्याची सर्व १०० टक्के रक्कम १५ टक्के व्याजासह संबंधित पतसंस्थांना विनाविलंब त्वरीत देण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे हे राज्य सरकार विसरले आहे.** आणि ही बाब अत्यंत चिंतणीय आहे. मुळ संकल्पना व सहकाराची व्यवस्था बाजूला ठेवून नवीन संकल्पनेच्या आधारावर पतसंस्थांच्या ध्रुव्वीकरणाची, कामकाजाची पध्दत राज्यातील पतसंस्थांना आणखी अडचणीची ठरणार आहे.

ज्यावेळेस महाराष्ट्र **राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक मा. रत्नाकर गायकवाड हे स्वत:च्या सहीने परिपत्रक काढून D. G. C या नियोजित संस्थेमध्ये गुंतवणुक करण्यासाठी परिपत्रक काढतात याचाच अर्थ असा की, याचे संपूर्ण दायित्व व कायदेशीर जबाबदारी राज्य सरकारची आहे.** आणि

आता वरिलप्रमाणे D. G. C. मध्ये गुंतविलेल्या सर्व रक्कमा १५ टक्के व्याजासह संबंधित पतसंस्थांना ताबडतोब परत करून मा. अण्णासाहेब हजारे यांच्या मुळ मागणीपासून कुठल्याही परिस्थितीत दूर जाता कामा नये. आणि यावर राज्य सरकार व मा. सहकार आयुक्तांनी भारत सरकार / भारतीय रिझर्व्ह बँक यांच्याकडे राज्यातील सर्व नोंदणीकृत १०० टक्के पतसंस्थांना '' डिपॉझिट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन'' (D I C G C)च्या धर्तीवर **पतसंस्थांसाठी इन्शुरन्स कंपनी स्वतः स्थापन करून** पतसंस्थांमध्ये रूपये १ लाखापर्यंत ठेवी ठेवणाऱ्या ठेवीदारांना कायदेशीर संरक्षण दिले पाहिजे. अन्यथा मा. अण्णासाहेब हजारे यांच्या एका पत्राने सरकार व सहकार खाते जसे जागे झाले त्या जागेपणाचा कारण नसताना उपद्रव राज्यातील पतसंस्थांना होईल, याकडे दुर्लक्ष करणे अक्षम्य ठरणार आहे.

**D. G. C. ची स्थापना, संबंधित अधिकारी, जमा केलेल्या रक्कमेचा विनियोग, केलेले कामकाज याबाबत चौकशी व कारवाईचे गुऱ्हाळ याच्याशी राज्यातील पतसंस्थांना काहीही देणे घेणे नाही.** सरकार स्वत:हून D. G. C. स्थापन करण्यासाठी परिपत्रक काढुन पुढे आले होते. आणि त्याची किंमत व परिणाम सरकारने सहन करण्याची जबाबदारी स्विकारली पाहिजे. हे आर्वजुन लक्षात आणुन देण्यात येत आहे. करायचे एकाने परंतु त्याची जबाबदारी टाळण्यासाठी जादूगाराप्रमाणे दुसरीकडे लक्ष केंद्रीत करून राज्यातील आम जनता, पतसंस्था, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते व प्रसार माध्यमे यांना संभ्रमित करणे येथून पुढच्या काळात कोणालाही शक्य नाही. म्हणून राज्य सरकारनेच आता याबाबतीत प्रथम वरील रक्कमा व्याजासह परत करण्यासाठी निर्णय जाहीर करावयास पाहिजे. अन्यथा चांगली एक बाजू दाखवून बऱ्याच वाईट, बेकायदेशीर व सुडभावनेने केलेले कामकाज जनतेसमोर येणार नाही. **चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचे काम** या राज्यात भविष्यात फार दिर्घकाळ कोणालाही करता येणार नाही.

पतसंस्थांच्या मुळ समस्या सरकार व सहकार खाते यांनी दुर्लक्षित करून राज्याची आर्थिक व्यवस्था बिघडवण्याचे काम ज्या व्यक्ती व संस्था करीत आहेत, त्यांना आता जनतेसमोर व प्रसार माध्यमांसमोर उघड करून स्वत:ची जबाबदारी सरकारला टाळता येणार नाही.महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या कायद्या अंतर्गत सरकार व सहकार आयुक्तांनी पतसंस्थांच्या बाबतीत १ महिन्याच्या आत खाालील निर्णय जाहीर करणे आवश्यक आहे.

पतसंस्थांसाठी राज्य सरकारने खाली दिल्याप्रमाणे **अ** आणि **ब** वर्गीकरणाप्रमाणे त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. ज्यामध्ये **अ** च्या पुर्ततेसाठी राज्य सरकारला एकही रूपाया खर्च येणार नाही.

**अ**

१. सहकारी निबंधकांकडे मागणी करणाऱ्या प्रत्येक पतसंस्थेस 'विशेष कर्ज वसुली व विक्री अधिकारी' देणे. (मागणी केल्यापासून १५ दिवसाच्या आत)

२. सर्व पतसंस्थांचे लेखापरिक्षण शुल्कासाठी आकारण्याचे दर बँक दराप्रमाणेच लागू करणे.

३. प्रत्येक पतसंस्थेचे लेखापरिक्षण प्रतिवर्षी करणेसाठी / करून घेणेसाठी योग्य ती यंत्रणा उभारणे.

४. प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च पर्यंतची नोंदणीकृत पतसंस्थांची नावे, नोंदणी क्रमांक, नोंदणीचा पत्ता तारीख, भाग भांडवल, ठेवी, कर्जे, थकबाकी, कर्मचारी, सिडी रेशो, तरलता, नफा – तोटा, तरतुदी, लेखापरिक्षण वर्गवारी व संचालकांची नावे, पत्ते इत्यादी संदर्भाची अद्यावत माहिती

दर्शविणारी **वेबसाईट** त्वरीत कार्यान्वित करणे.

५. कलम १०१ अंतर्गत दाव्याचा निकाल अर्ज दाखल केल्यापासून ३ महिन्यांच्या आत वसुली दाखलेबाबत निर्णय घेणे.

६. पतसंस्थामधून घेतलेली कर्जे बुडविण्याच्या दृष्ट हेतुने पतसंस्थांनाच वेठीस धरणाऱ्यांना तक्रार केल्यापासून ७ दिवसांच्या आत पोलिसांच्या ताब्यात देणे व त्या अनुषंगाने योग्य तो आदेश संबंधितांना देणे.

७. पतसंस्थांमधील पदाधिकारी / संचालक / अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व त्यांचे अंतर्गत चालणारी जिल्हा बोर्ड, प्रशिक्षण केंद्र, विभागिय मंडळे तसेच राज्यातील पतसंस्थांचे सर्व फेडरेशन्सच्या व्यतिरिक्त प्रशिक्षणाच्या नावाखाली पतसंस्थांना वेठीस धरणाऱ्या खाजगी व सरकारी प्रशिक्षण केंद्रे त्वरीत कायद्याने बंद करणे.

८. सरकार व सहकार खात्याच्या माध्यमातून पतसंस्थांमधून राजकीय किंवा अन्य नेत्यांच्या वाढदिवस, जाहिराती, देणग्या, इतर आकस्मित व भावनाशील व नैसर्गिक आपत्तीची कारणे देवून कुठल्याही परिस्थितीत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या रकमा जमा न करण्याचे आदेश जारी करणे.

९. पतसंस्थांच्या खेळते भांडवल, शाखा विस्तार, कर्मचाऱ्यांची संख्या यावर आधारभूत लेखापरिक्षणाचा कालावधी निश्चित करणे.

१०. कॉसिज्युडिसीयल अधिकार ज्यांना आहेत त्याचा वापर व निर्णय / आदेशामध्ये सातत्य ठेवून न्याय देण्याचे काम न्यायदेवता सारखेच होण्यासाठी कालावधी निश्चित करणे.

११. पतसंस्थांना नागरी सहकारी बँकाप्रमाणे सामोपचार परतपेड योजना लागु करणे.

१२. प्रत्येक वॉर्डात / तालुक्यात सहकार खात्याचे अधिकारी यांची संस्थावार समन्वयासाठी अधिकाऱ्यांचे व संस्थेच्या नावासहित महिन्यातून किमान एकदा प्रत्येक पतसंस्थेमध्ये जावून भेटीद्वारे पालक अधिकारी म्हणुन काम करणे.

१३. पतसंस्थांचा उपविधी दुरूस्तीची प्रकरणे, विविध कामासाठी मागितलेल्या परवानगीची प्रकरणे, तक्रारींचा निपटारा, माहिती उपलब्ध करून देणे संदर्भात अर्ज केल्यापासून १५ दिवसाचे आत जो निर्णय असेल तो लेखी देण्याचे धोरण जाहीर करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

**ब**

१. थकबाकी / कर्ज वसुली करणेसाठी काम करणारे पतसंस्थांचे पदाधिकारी / संचालक / अधिकारी / कर्मचारी / विशेष वसुली व विक्री अधिकारी यांना शासनाने व संबंधित पोलिस ठाणे यांना मागणी केल्यापासुन ३ दिवसाच्या आत योग्य व पुरेशे असे पाठबळ व संरक्षण देणे.

२. पतसंस्थांना त्यांच्या कार्यालयीन जागेसाठी शासकीय कोट्यातून जागा आरक्षित करण्याचे व त्याचे वितरण करण्याचे आदेश देवून त्याची नियमावली जाहीर करणे.

३. पतसंस्थांमध्ये झालेले एन. पी. ए. ची रक्कम राज्य शासनाने साखर कारखाने व इतर सहकारी संस्थांना दिलेल्या पॅकेजच्या आधारावर देण्यासाठी धोरण जाहीर करणे व त्याची त्वरीत अंमलबजावणी करणे.

४. सहकार खात्यातील त्या – त्या कार्यालयातील अधिकारी, त्यांची नावे, कार्यालयाचे पत्ते, दुरध्वनी, अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक, कार्यालयात उपलब्ध असण्याची वेळ याची अद्यावत माहिती देणेसाठी दैनंदिन अपडेट केलेली वेबसाईट प्रत्येक वॉर्ड / तालुका / जिल्हा / विभाग स्तरावर चालू करणेसाठी त्वरीत निर्णय घेणे.

वरील **अ** प्रमाणे पतसंस्थांच्या मूळ गरजा शासनाने व सहकार खात्याने सहज त्यास होकार देण्याचे / मान्य करण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आदेश पारित करण्याचे विषय आहेत. की ज्यामुळे मा. अण्णासाहेब हजारे ज्या कारणासाठी बँका / पतसंस्थांमधील ठेवीदारांचे संरक्षणासाठी आग्रही झालेले आहेत, त्याची पूर्तता वरील गोष्टीची पूर्तता शासनाने केल्यानंतरच शक्य आहे. अन्यथा ज्यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी केलेली बेकायदेशीर कामे लपविण्यासाठी पतसंस्थांना भरडण्याचे काम या निमित्ताने होईल. यापेक्षा वेगळे काहीही होवू शकणार नाही. हा आमचा सहकारातील ३२ वर्षांचा अनुभव आहे.

सर्वांना माहित असले तरी आपल्या **सर्वांना, सरकारला व प्रामुख्याने मा. अण्णांसाहेब हजारे यांना जाणीवपूर्वक व जाहीरपणे आम्ही माहिती देतो की, महाराष्ट्र राज्यातील शेकडो साखर कारखान्यांनी भोळ्या भाबड्या शेतकऱ्यांच्या – ऊस उत्पादकांच्या ऊसाच्या बिलातून बेकायदेशीररित्या परस्पर कपाती केलेल्या सर्वसाधारणपणे रूपये ३ हजार कोटी व व्याजासहित रक्कमा शेतकऱ्यांना मागणी करूनही अद्याप दिलेल्या नाहीत.** राज्यातील साखर कारखान्यांनी २५ वर्षापासून ठेवी परत दिलेल्या नाही. **शेतकऱ्यांना त्या ठेवीवरील अद्यावत व्याजही देलेले नाही. शेतकऱ्यांच्या भाग – भांडवलावर एकाही साखर कारखान्याने या क्षणापर्यंत लाभांष दिलेला नाही.** २५ – २५ वर्षे साखर कारखाने संचित तोट्यात असताना त्या साखर कारखान्यांना **अ स्टार** लेखापरिक्षणाची वर्गवारीचे प्रशस्तीपत्र देवून राज्यातील किमान ७ कोटी शेतकऱ्यांना नियमितपणे खुलेआम फसविले आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाचे व घामाचे पैसे किंबहूना व्याज सुध्दा दिले जात नाही. शेतकऱ्यांच्याच ऊसाच्या बिलातुन शेतकऱ्यांची लेखी संमती न घेता परस्पर मुख्यमंत्री निधी, अल्पबचत निधी, दुष्काळ निधी , भुंकपग्रस्त निधी इत्यादी निधी मिळण्यासाठी शेतकऱ्यांच्याच पैशाचा खुलेआम वापर केला जातो. लेखा परिक्षक, साखर आयुक्त, सहकार आयुक्त, सहकार सचिव या संदर्भात कुठेही, केव्हाही, कोणावरही कारवाई करीत नाहीत. उलट पक्षी हे सर्व संबधीत साखर कारखाने आपल्या नेहमीच्या तंत्राचा , पैशाचा, सत्तेचा वापर करुन मिळवलेली विविध बक्षीसे व ढाली वार्षीक सभेत सभासंदाच्या पुढे प्रर्दशित करून शेतकऱ्यांना – ऊस पुरवठादारांना जाहिरपणे लुटले जात आहे. हे अण्णासाहेबांसहीत सर्वांना ज्ञात आहे. आणि यासाठी अण्णासाहेबांनी संबधीताच्या विरोधात उपोषण सुरू केल्यास महाराष्ट्रातील कोट्यावधी शेतकरी सुध्दा अण्णांसाहेबांचे ऋण पुढील आयुष्यात देखील फेडू शकणार नाहीत.

हिरे – सोन्याच्या खाणिचे लुटारु यांना सही सलामत सोडून गरज व भुकेपोटी दुसऱ्याच्या शेतातील हरबरा उपटून त्यातील दाणे खाणाऱ्यांचे आयुष्य उध्वस्त करुन, त्यांना कायद्याच्या चौकटीत गुरफटवून त्यांचे शोषण करुन व यंत्रणेचा गैरफायदा घेऊन त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन बेआब्रु करणे हे नीच काम सतत चालूच आहे. **मा. अण्णासाहेबांनी ह्या व्यवस्थेचा बुरखा फाडला पाहिजे.** राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या विचार सरणीने प्रभावीत झालेले व प्रत्यक्ष कृतीने सिध्द करणारे मा. आण्णासाहेबांच्या या कृतीची

आम्ही चातकासारखी वाट पहात आहोत. व त्याही अंदोलनात हे संपूर्ण राज्यच प्रत्यक्ष सामील झाल्याचे खरे सहकारातील चित्र त्यावेळी उघड होणार आहे. या राज्याची सर्व सामन्य माणसांची आर्थीक स्थीती व ज्यांनी सर्वसामान्य जनता व शेतकरी – कष्टकरी यांचे आर्थिक शोषण केले त्यांना जेरबंद करून संबंधितांना आर्थीक न्याय देण्याच्या कृतीस निश्चीतपणे केवळ पतसंस्थामधील नव्हे तर सहकारातील सर्वसामान्य कार्यकर्ते आपल्या बरोबरच असतील आणि याचे उत्तर काळच देईल.

स्वतंत्र भारताला ६०वर्ष पूर्ण झाली आहेत. मा. अण्णासाहेबांच्या एका पत्रकाने सगळे भांबाहून गेल्यामुळे आपल्या स्वार्थी अस्तित्वासाठी व प्रसिध्दीसाठी सरसावलेल्यांच्या मानसिकतेची प्रत्येकजण किव करीत आहे. सभा, भेटी, मुलाखती, निवेदने, बातम्या याचे उथळ प्रदर्शन त्वरीत थांबविणे आवश्यक आहे. अन्यथा पतसंस्था व कार्यकर्ते यांचा भ्रमनिरास होऊन साप सोडून भुई धोपटण्याचे काम नेहमीप्रमाणे सर्वांची फसगत करील व आपले पाप व बेकायदेशीर कृत्य लपविण्यासाठी सर्वांचा बळी घेतला जाईल. यासाठी मा. अण्णासाहेबांनी याची त्वरीत दखल घ्यावी, अशी विनंती आम्ही करीत आहोत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**